आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अभ्यासाच्या शैलीवर विश्वास ठेवावा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘परीक्षा पे चर्चा’ मधून आवाहन

- व्याजदर जैसे थे ठेवायचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, अवैध ऑनलाईन व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या बँक ग्राहकांना २५ हजार रुपये भरपाई द्यायचा प्रस्ताव

- मेघालयमध्ये कोळसा खाणीत झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या १९ वर

- नेपाळमध्ये बस अपघातात १३ जणांचा मृत्यू तर ३४ जण जखमी

**आणि**

- १९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताची विजेतेपदाकडे आगेकूच

**<><><><><>**

प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अध्ययन शैलीवर विश्वास ठेवावा असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'परीक्षा पे चर्चा' या संवादात्मक कार्यक्रमाच्या नवव्या आवृत्तीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष द्यावं, त्यावर विचार करावा आणि स्वतःचे अनुभव आणि आकलन यांची सांगड घालून आत्मविश्वासानं परीक्षांना सामोरं जावं, असा सल्ला त्यांनी दिला. योग्य अभ्यास, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतंही कौशल्य मिळवता येत नाही यावर त्यांनी भर दिला.

- ***- - होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - -***

- **<><><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं आज व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला. बुधवारपासून सुरू झालेल्या समितीच्या बैठकीतले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे.

**होल्ड... बाईट- संजय मल्होत्रा**

अवैध इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमुळं ग्राहकांना होणाऱ्या नुकसानावर मर्यादा आणण्यासाठी दिशानिर्देशांचा मसुदा रिझर्व्ह बँक जाहीर करणार आहे. त्यानुसार छोट्या रकमेच्या नुकसानीसाठी ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव आहे. ही नुकसानभरपाई प्रत्येक ग्राहकाला एकदाच दिली जाईल. याबद्दलचे तपशील लवकरच दिले जातील, अशी माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली.

तसंच ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यातून ऑनलाइन व्यवहार करताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय लागू करण्याचाही बँकेचा विचार आहे. याशिवाय बँकांचे वसुली एजंट तसंच दिशाभूल करुन ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या विविध विमा आणि इतर योजनांच्या संदर्भात सुधारित दिशानिर्देशांचा मसुदाही रिझर्व्ह बँक लवकरच जाहीर करणार आहे.

**<><><><><>**

विरोधकांच्या गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२ पर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. पुणे ते दिल्ली दरम्यान वंदे भारत, तेजस, राजधानी यासारख्या गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी शून्य प्रहरादरम्यान केली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या संमतीनं राज्यसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेचं एका धोरणात्मक उपक्रमातून राष्ट्रीय चळवळीत रूपांतर झालं आहे, असं महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी लोकसभेत एका प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात म्हटलं आहे. राष्ट्रीय स्तरावर लिंग गुणोत्तराचं प्रमाण वर्ष २०१४ मध्ये ९१८ होतं, २०२४-२५मध्ये ते वाढून ९२९ झालं.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या मतदान होणार आहे. सकाळी साडे ७ वाजता मतदानाला सुरुवात होईल आणि संध्याकाळी साडे पाचपर्यंत मतदान सुरू राहणार आहे. या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी, ९ फेब्रुवारीला होणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ जागांसाठी २ हजार ६२४ उमेदवार रिंगणात आहेत. तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक

लढवत आहेत. जिल्हा परिषदेसाठी सर्वाधिक २९४ उमेदवार धाराशिवमध्ये तर पंचायत समित्यांसाठी सर्वाधिक ४९६ उमेदवार पुण्यातून निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

राज्यात विविध महानगरपालिकांच्या महापौर आणि उपमहापौरांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. काही महापालिकांमध्ये दोन्ही पदांवरचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. **कोल्हापूरच्या** महापौरपदी भाजपच्या रूपाराणी निकम तर उपमहापौरपदी जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय जरग यांची निवड झाली आहे. **अमरावती**च्या महापौरपदी भाजपाचे श्रीचंद तेजवानी यांनी, तर उपमहापौर पदी युवा स्वाभिमान पक्षाचे सचिन भेंडे यांनी विजय मिळवला आहे. **नागपूर**च्या महापौरपदी भाजपच्या नीता ठाकरे तर उपमहापौर पदी भाजपच्याच लीला हातीबेड निवडून आल्या आहेत. **धुळ्या**च्या महापौर पदावर भाजपाच्या मायादेवी परदेशी यांची तर उपमहापौर पदावर ज्योत्स्ना पाटील यांची आज बहुमताने निवड झाली. **जळगाव**च्या महापौर म्हणून भाजपच्या दीपमाला काळे यांची तर उपमहापौरपदी शिवसेनेचे मनोज चौधरी यांची आज बिनविरोध निवड झाली. **अहिल्यानगर**च्या महापौर म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे आणि उपमहापौर म्हणून भाजपाचे धनंजय जाधव यांची बिनविरोध निवड झाली. **नांदेड** महापालिकेच्या येत्या १० तारखेला होणाऱ्या महापौर पदाच्या निवडणुकीसाठी भाजपा, एमआयएम आणि काँग्रेस- वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी आज शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केले. **जालन्या**च्या महापौर पदासाठी आज भाजपच्या वंदना मगरे, तर उपमहापौर पदासाठी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. **सोलापूर**च्या महापौरपदी भाजपाचे विनायक कोंड्याल आणि उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

**<><><><><>**

मेघालयमध्ये पूर्व जैतिया हिल्स जिल्ह्यातल्या कोळसा खाणीत झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या १९ वर पोहोचली आहे. घटनास्थळी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचं बचावकार्य अद्याप सुरु आहे. मेघालयचे मुख्यमंत्री कोनार्ड के संगमा यांनी बचावकार्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी दोन मंत्र्यांवर सोपवली आहे. अपघातातून वाचलेल्या आठ जणांवर रुग्णालयामध्ये उपचार सुरु आहेत तर या दुर्घटनेच्या संदर्भात दोन जणांना अटक करण्यात आली असून जिल्हा प्रशासनानं कोळसा खाण आणि तिथली उपकरणं ताब्यात घेतली आहेत.

<><><><><>

नेपाळमध्ये एका वऱ्हाडाला घेऊन जाणाऱ्या बसला झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून त्यापैकी आठ जणांचा जागीच तर पाच जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पश्चिम नेपाळमध्ये पुरचैदी बडगाव इथं झालेल्या या अपघातात जखमी झालेल्या ३४ जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><><>

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद मध्ये आज शिया पंथाच्या इमामबरगाह या अध्यात्मिक केंद्रात झालेल्या एका आत्मघातकी स्फोटात १५ जण ठार तर ८० जण जखमी झाले. सुरक्षारक्षकांनी हा स्फोट करणाऱ्या व्यक्तीला इमामबरगाहच्या प्रवेशद्वारावर अडवलं असता त्यानं स्वतःला उडवून दिलं, असं पोलिसांनी सांगितलं. इस्लामाबाद मधल्या सर्व रुग्णालयांमध्ये आपत्कालीन परिस्थिती घोषित केली असून सर्व जखमींवर उपचार सुरु आहेत.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी श्रीलंकेच्या जनता विमुक्ती पेरामुना पक्षाचे सरचिटणीस टिल्विन सिल्वा आणि त्यांच्या शिष्टमंडळाशी आज संवाद साधला. दोन्ही देशांनी विकासाच्या संधी आणि सामाजिक कल्याणकारी उपक्रमांवर चर्चा केल्याचं डॉ. एस. जयशंकर यांनी आपल्या एक्स या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. आर्थिक संकटाच्या काळात आणि 'दितवाह' चक्रीवादळानंतरच्या परिस्थितीत भारत श्रीलंकेच्या पाठीशी उभा राहिला आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय वैद्यकशास्त्र परीक्षा मंडळाने नीट- पीजी २०२५ -२६ परीक्षेतल्या पात्रतेसाठीचे कटऑफ पर्सेन्टाइल कमी करण्याच्या निर्णयाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टीकरण मागितलं आहे. न्यायमूर्ती पी एस नरसिंह आणि आलोक आराधे यांनी परीक्षा मंडळाला प्रतिज्ञापत्र देण्यासाठी २ आठवड्यांची मुदत दिली आहे. देशभरातल्या वैद्यकीय महाविद्यालयातल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १८ हजार जागा रिक्त राहिल्यामुळे परीक्षा मंडळाने २०२५ सालच्या नीट पीजी प्रवेशासाठीचा राखीव जागांचा कटऑफ पर्सेन्टाइल ४० वरून एकदम शून्यावर आणला. त्यामुळे ज्या उमेदवारांना शून्यापेक्षाही कमी गुण मिळाले होते तेही उमेदवार

तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी पात्र ठरले होते. खुल्या प्रवर्गातल्या उमेदवारांसाठी कटऑफ ५० पर्सेन्टाइलवरून ७ वर आणला गेला होता. अशा प्रकारे कमी केलेल्या कटऑफमुळे कायद्याचा भंग होत असल्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरु आहे.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताची विजेतेपदाकडे आगेकूच सुरू आहे. प्रथम नाणेफेक जिंकून भारताने दमदार फटकेबाजी करत इंग्लंडसमोर विजयासाठी ४१२ धावांचं लक्ष्य ठेवलं. सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशीनं ८० चेंडूंमध्ये १७५ धावांची विक्रमी खेळी केली. कर्णधार आयुष म्हात्रे, अभिज्ञान कुंडू, वेदांत त्रिवेदी, विहान मल्होत्रा, कनिष्क चौहान या फलंदाजांनीही धावफलक हलता ठेवला. भारताने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडनेही जोरदार फलंदाजी केली. मात्र, भारतीय गोलंदाजांनी त्यांना खेळपट्टीवर टिकू दिलं नाही. संघही

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या ३९ षटकांत ९ बाद २९४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**